## नि.दि.मु.क्र.१२३/२०२३ मधील निशाणी १३ वरील आदेश

(दि. २१/०६/२०२४ रोजी घोषित)

प्रतिवादींनी प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ७ नियम ११ अन्वये वादपत्र नाकारण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की वादीच्या दाव्यातील वाद कथनांवरुन वाकाजी महाराज संस्था ही नोंदणीकृत संस्था असुन त्याचे कामकामाज धर्मदाय आयुक्त कार्यालयामार्फत चालते हे स्पष्ट होत आहे. असे असतांना वादीने प्रस्तुत दावा दाखल करण्यापुर्वी महाराष्ट्र सार्वजनिक न्यास अधिनियमाचे कलम ५१ प्रमाणे धर्मदाय आयुक्त यांची परवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र वादीने अशा प्रकारची परवानगी घेतल्याचे दाव्यामध्ये कथन केलेले नाही अथवा असा कोणताही दस्त दाखल केलेला नाही. प्रतिवादींचे पुढे असे म्हणणे आहे की वादी हा वाकाजी महाराज संस्थानचा अध्यक्ष आहे असे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाप्रमाणे मंदिराचा पुजारी हा संस्थानचा अध्यक्ष अथवा मालक होवू शकत नाही. त्यामुळे प्रस्तुत वादपत्र नाकारण्यात यावे अशी प्रतिवादींनी विनंती केलेली आहे.

३. वादीने निशाणी १४ कडे त्याचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास तिव्र हरकत उपस्थितीत केलेली आहे. वादीचे असे म्हणणे आहे की आदेश ७ नियम ११ मध्ये नमुद असलेल्या कोणत्याही तरतुदीची बाधा प्रस्तुत दाव्यास येत नाही. तसेच वाकाजी महाराज संस्थान ची मालमत्ता सार्वजनिक नसुन वादीची मालमत्ता आहे. त्यामुळे कलम ५१ प्रमाणे धर्मदाय आयुक्त यांची परवानगी घेणे बंधनकारक नाही असे वादीचे म्हणणे आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह खारिज व्हावा अशी वादीने विनंती केलेली आहे.

४. मी दोन्ही बाजुंच्या सुविद्य विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादपत्रांचे अवलोकन केले.

५. दिवाणी प्रकिया संहितेच्या आदेश ७ नियम ११ खाली वादपत्र नाकारण्यासाठी प्रतिवादींनी वादपत्रातील कथनांवरुन हे दाखविणे आवश्यक आहे की सदर वादपत्रास कोणत्याही इतर कायद्याची बाधा येते. सदर तरतुदीखाली अर्ज निकाली काढताना प्रतिवादींनी उपस्थित केलेला बचाव व वाद कथने बघता येत नाही. या पाश्वभुमीमध्ये वादपत्राचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा वाकाजी महाराज संस्थान तर्फे अध्यक्ष या नात्याने रमेश रामराव भगत यांनी दाखल केलेला आहे. वाद पत्रातील वाद कथनांचे अवलोकन केले असता प्रतिवादींचा वाकाजी महाराज संस्थान शी कोणताही संबंध नसताना ते संस्थानच्या कार्यात ढवळाढवळ करतात असे वादीचे म्हणणे आहे. त्यामुळे वादीने कायमच्या ताकीदीची मागणी केलेली आहे.

६. महाराष्ट्र सार्वजनिक न्यास अधिनियमाचे कलम ५० प्रमाणे सार्वजनिक न्यासा विरुध्द अथवा विश्वस्तांविरुध्द दावा दाखल करण्यासाठी अथवा सार्वजनिक न्यासाबाबत दावा दाखल करण्यासाठी धर्मदाय आयुक्त यांची पुर्व परवानगी घ्यावी लागते. प्रतिवादींच्या सुविद्य विधिज्ञांनी कलम ५० सह कलम (iv) वर भिस्त ठेवून युक्तीवाद केला की प्रस्तुत दाव्यास धर्मदाय आयुक्त यांची परवानगी आवश्यक आहे. याउलट वादीच्या सुविध विधीज्ञांनी अशा स्वरुपाच्या परवानगीची आवश्यकता नाही असा युक्तीवाद केला आहे.

७. कलम ५० सह कलम (iv) चे अवलोकन केले असता सार्वजनिक न्यास अथवा विश्वस्त यांनी दाखल केलेल्या अथवा यांच्या विरुध्द दाखल झालेल्या घोषणा अथवा ताकीदीच्या दाव्यासाठी धर्मदाय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

मात्र कलम ५० चे संपुर्णपणे वाचन केले असता त्यातील पोट कलम (a) ते (q) यामध्ये नमुद असलेल्या कोणत्याही दादी संबंधी जर तो दावा असेल तरच अशा स्वरुपाची परवानगी घेणे आवश्यक आहे असे दिसून येते.

८. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता व वादीने मागणी केलेल्या ताकीदीचे स्वरुप पाहता ते कलम ५० पोट कलम (a) ते (q) मध्ये बसत नाही असे माझे मत आहे. त्यामुळे प्रतिवादींनी उपस्थित केलेला त्याबाबतचा आक्षेप ग्राहय धरता येणार नाही. त्याचप्रमाणे वादी हा वाकाजी महाराज संस्थानचा अध्यक्ष आहे किंवा नाही व तो मंदिराचा पुजारी आहे किंवा नाही याबाबी दाव्याच्या या टप्प्याला पुराव्याशिवाय ठरविता येणार नाहीत. मी या पुर्वी नमुद केल्याप्रमाणे आदेश ७ नियम ११ प्रमाणे वाद पत्र नाकारण्यासाठी केवळ वाद पत्रामधील कथनांचा आधार घेता येतो. प्रस्तुत दाव्यातील वाद कथने पाहता प्रस्तुत दावा कोणत्याही कायद्याने बाधीत आहे असे दिसून येत नाही.

९. वरील सर्व विवेचनावरुन प्रस्तुत अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | | |
|---|---|---|
| | प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात येतो. | |

BHANUPRATAP BASANTSINGH CHOUHAN
Digitally signed by BHANUPRATAP BASANTSINGH CHOUHAN
Date: 2024.06.24 10:31:45 +0530

अकोट
दिनांक २१.०६.२०२४

भानुप्रताप चौहान
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : P. J. Yadav |
| Name of the Court | : Jt.Civil Judge J.D. Akot |
| Date of Judgment | : 21–06–2024 |
| Signed by Presiding Officer on | : 21–06–2024 |
| Judgment uploaded on | : 24–06–2024 |